## पद्मभूषण स्व. डॉ. बाळासाहेब विखे पाटील यांच्या जयंतीनिमित्त

# वांबोरीत नेत्ररोग निदान शिबीर संपन्न



**उंबरे (वार्ताहर)–** पद्मभूषण स्व. डॉ. बाळासाहेब विखे पाटील यांच्या जयंतीनिमित्त वरद नेत्रालय अहिल्यानगर व उदयसिंह पाटील मित्र मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत नेत्ररोग तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

या शिबिराचे उद्‌घाटन जिल्हा परिषदेचे माजी सभापती ॲड. सुभाषराव पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. या शिबिराच्या उद्‌घाटनप्रसंगी ॲड. पाटील यांनी पद्मभूषण स्व. विखे पाटील जुन्या आठवणींना उजळा देत त्यांच्या राजकीय कारकीर्दीमध्ये व समाजासाठी विविध योजना राबवल्या तसेच आरोग्य सुविधा मिळवून गोरगरिबांना उपचारासाठी मदत केली. आज पद्मभूषण बाळासाहेब विखे पाटील यांनी समाजाला दूरदृष्टी मिळवून देण्याचे काम केले, असे सांगितले. वरद नेत्रालयाचे नेत्र रोग तज्ञ डॉ.स्मिता पटारे व डॉ.रावसाहेब बोरुडे हे उपस्थित होते. डॉ. स्मिता पटारे यांनी नेत्ररोग बाबत माहिती दिली. व वरद नेत्रालय अहमदनगर येथे मोतीबंद शस्त्रक्रिया महात्मा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत डोळ्यावर आलेले मांस पडदा रेटणाच्या ठराविक शस्त्रक्रिया लासुर, तिरळेपणा, काजबिंदू तसेच नेत्ररोपण शस्त्रक्रिया मोफत करण्यात येतील असे सांगितले. डॉ. रावसाहेब बोरुडे यांनी विविध नेत्र रोगाबाबत व नेत्र रोगाच्या लक्षणांबाबत सविस्तर माहिती दिली. याप्रसंगी ग्रामपंचायत सदस्या शितल मकासरे, सारंगधर पटारे, भाजपा अध्यक्ष प्रमोद गांधले, डॉ. प्रसाद दराडे, श्री. साबळे, रवींद्र पटारे, संजय नागदे, विलास गुंजाळ, शिवाजी मोरे, मेजर दिलिप जवरे, मनोज बिहानी, हेमंत मुथा, रामा बोरकर, भाऊ पटारे, भास्कर भरसाकळ, जालु कांबळे, लक्ष्मण ढवळे, रामा धनवडे, मच्छिंद्र जगदाळे, सुदाम पाटील आदी उपस्थित होते. तसेच मोठ्या संख्येने नेत्र रुग्णांनी शिबिराचा मोठ्या प्रमाणात लाभ घेतला.

# विकसित महाराष्ट्र २०४७: मुख्यमंत्र्यांचा १५० दिवसांचा प्रशासकीय सुधारणा कार्यक्रम सुरु

## फडणवीस यांची चौंडीत घोषणा; १०० दिवसांच्या यशस्वी उपक्रमानंतर वाटचाल

**अहिल्यानगर (प्रतिनिधी)–** शंभर दिवसांच्या यशस्वी उपक्रमानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आता 'विकसित महाराष्ट्र २०४७' या नावाने १५० दिवसांचा व्यापक प्रशासकीय सुधारणा कार्यक्रम जाहीर केला. या उपक्रमाचा उद्देश राज्य शासनाच्या कार्यप्रणालीत दीर्घकालीन सुधारणा घडवून आणणे आणि पूर्णपणे डिजिटल व लोकाभिमुख प्रशासन घडवणे हा आहे. या कार्यक्रमाचा कालावधी ६ मेपासून सुरू होऊन २ ऑक्टोबर २०२५ पर्यंत असेल.

राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीनंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी चौंडी (ता. जामखेड) येथे हा कार्यक्रम जाहीर केला. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व अजित पवार, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, जलसंपदा तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, तसेच विधान परिषदेचे सभापती राम शिंदे उपस्थित होते. मुख्यमंत्री म्हणाले, पूर्वीच्या १०० दिवसांच्या कार्यक्रमात राज्यातील १२ हजार ५०० शासकीय कार्यालयांनी विविध प्रशासकीय सुधारणा केल्या, तर ४८ विभागांनी एकूण ९०२ सुधारणा जाहीर केल्या. यातील ७०६ सुधारणा पूर्ण झाल्या असून हा आकडा ७८ टक्के इतका आहे. या नवीन कार्यक्रमांतर्गत २०२९, २०३५ आणि २०४७ अशा तीन टप्प्यांमध्ये 'विकसित महाराष्ट्र' हा दूरदृष्टीपूर्ण 'रोडमॅप' तयार केला जाणार आहे. सर्व शासकीय कार्यालयांनी १०० टक्के ई-गव्हर्नन्स अंमलात आणण्याचे उद्दिष्ट ठेवले असून, त्यामुळे नागरिकांना कार्यालयात प्रत्यक्ष येण्याची गरज भासणार नाही. सर्व सेवा ऑनलाइन आणि पारदर्शक पध्दतीने मिळणार असल्याचे त्यांनी सांगितले. या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश म्हणजे प्रशासन अधिक जबाबदार आणि उत्तरदायित्वपूर्ण बनवणे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या लोकाभिमुख राज्यकारभाराच्या आदर्शावर आधारित हा उपक्रम राबवला जाणार आहे. या १५० दिवसांच्या उपक्रमाचा निकाल २ ऑक्टोबर रोजी जाहीर करण्यात येईल.

दरम्यान, १०० दिवसांच्या कार्यक्रमातील उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या विभागांचा पुरस्कार वितरण सोहळा आज बुधवार, ७ मे रोजी पार पडणार असून, त्या वेळी या नवीन धोरणाच्या अधिकृत मार्गदर्शक सूचनाही जाहीर केल्या जाणार असल्याचे यावेळी फडणवीस यांनी सांगितले.

# 'स्थानिक' निवडणुकांमध्ये महायुती एकत्र- फडणवीस

## स्थानिक समीकरणांनुसार स्वतंत्र निर्णय घेण्याची तयारी

**अहिल्यानगर (प्रतिनिधी)–** राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची रणधुमाळी लवकरच सुरू होणार असून या निवडणुकांना महायुती एकमताने सामोरे जाईल. मात्र काही ठिकाणी स्थानिक राजकीय समीकरणांनुसार स्वतंत्र निर्णय घेऊन लढावे लागेल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व अजित पवार यांच्या उपस्थितीत स्पष्ट केले.

महायुतीतील तीन प्रमुख घटक भाजप, शिवसेना (शिंदे गट) आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) या निवडणुकांना कसे सामोरे जाणार, यावर चौंडी येथे झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीनंतर आयोजित पत्रकार परिषदेत मुख्यमंत्री फडणवीस यांनी ही माहिती दिली. सर्वोच्च न्यायालयाने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका पुढील चार महिन्यांत घेण्याचे आदेश दिले असून, या निर्णयाचे स्वागत मुख्यमंत्री फडणवीस यांनी केले. निवडणूक आयोगाला तयारी करण्याची विनंती केली जाईल. निवडणुकांमध्ये भाटिया आयोगाच्या शिफारशीनुसार ओबीसी आरक्षण पूर्णपणे लागू राहील, असे त्यांनी स्पष्ट केले. महायुतीने निवडणुकांसाठी सामूहिक रणनिती आखण्याचा निर्णय घेतला असला तरी, विविध जिल्ह्यांतील स्थानिक राजकीय परिस्थिती लक्षात घेता काही ठिकाणी अपवादात्मक निर्णय घेतले जाण्याची शक्यता आहे. महायुतीचे तीनही घटक सत्तेत सहभागी असूनही, स्थानिक निवडणुकांमध्ये तिघांचे राजकीय हितसंबंध आणि स्थानिक पातळीवरील नेतेमंडळींची गणितं वेगवेगळी असू शकतात. त्यामुळे एकमताने लढण्याचा निर्धार असतानाही, वास्तवात काही ठिकाणी संघर्षात्मक परिस्थिती उद्‌भवण्याची शक्यता वर्तवली जात आहे. या पार्श्वभूमीवर महायुतीची राजकीय परीक्षा केवळ लोकसभा किंवा विधानसभा नव्हे, तर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांतही कस लागणारी ठरणार आहे.

# पुणे जिल्ह्यात आज तीन ठिकाणी मॉकड्रिल

**पुणे (प्रतिनिधी)–** युद्धजन्य परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर केंद्र शासनाच्या सूचनेनुसार आज सायंकाळी चार वाजता पुणे जिल्ह्यात तीन ठिकाणी मॉकड्रिल घेण्यात येणार आहे, अशी माहिती जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी पत्रकार परिषदेत दिली. दरम्यान हे मॉकड्रिल केवळ खबरदारीचा उपाय म्हणून होत असून, यावेळी जे भोंगे वाजतील त्यामुळे कोणीही घाबरून जाऊ नये असे आवाहन ही जिल्हाधिकारी यांनी यावेळी केले.

पहेलगाम येथील दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने पाकिस्तान विरोधात कारवाईचे मोठे संकेत दिले आहेत. सध्या भारत पाकिस्तान युद्धाची जोरदार चर्चा सर्वत्र आहे. याच पार्श्वभूमीवर केंद्र सरकारच्या सूचनेनुसार देशात २४४ ठिकाणी खबरदारीचा उपाय म्हणून किंबहुना युद्ध झाल्यास काय खबरदारी घ्यावी यासाठी हे मॉकड्रिल केले जात आहे. केंद्र शासनाच्याच्या सूचनेनुसार काल राज्य शासनाने या मॉकड्रिलच्या तयारीसाठी बैठक घेतली. या बैठकीत महाराष्ट्रात पुणे, ठाणे, रत्नागिरी, मुंबई व सिंधुदुर्ग येथे मॉकड्रिल घेण्यात येणार आहे. पुणे शहरात विधान भवन येथे व जिल्ह्यात तळेगाव नगरपरिषद व मुळशी पंचायत समिती येथे हे मॉकड्रिल सायंकाळी चार वाजता होईल. यामध्ये लष्कर, पोलीस, एअर फोर्स, अग्निशामक दल, आरोग्य यंत्रणा, महसूल विभाग, महाविद्यालयीन विद्यार्थी, एनसीसी कॅडेट आदी यंत्रणा सहभागी होणार आहेत. युद्ध झाल्यास जर देशात कुठेही लष्करी हल्ला झाला तर, कमीत कमी कालावधीत मदत कार्य कसे पोहोचवता येईल व उद्भवलेल्या आपत्तीमध्ये सर्वसामान्यांना कसे संकट मुक्त करता येईल यासाठी हे मॉकड्रिल होत आहे.

## मनकर्णा नेहे यांचे निधन



**लोहगाव (वार्ताहर)–** राहाता तालुक्यातील दुर्गापूर येथील मनकर्णा नामदेव नेहे (वय ८५) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात एक मुलगा, दोन मुली, जावई, पुतणे, नातू असा परिवार आहे. दशरथ नेहे यांच्या त्या मातोश्री होत.

## वंदना तांबे यांचे निधन



**लोहगाव (वार्ताहर)–** राहाता तालुक्यातील लोहगाव (तांबेनगर) येथील श्रीमती वंदना विलास तांबे (वय ४९) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, एक मुलगी, सून, जावई, नातवंडे, दीर, पुतणे असा परिवार आहे. विशाल तांबे व तुषार तांबे यांच्या त्या मातोश्री तर तात्यासाहेब तांबे यांच्या भावजयी होत.

## सिंधूबाई म्हसे यांचे निधन



**कोंढवड (वार्ताहर)–** राहुरी तालुक्यातील कोंढवड येथील सिंधूबाई आप्पासाहेब म्हसे (वय ७४) यांचे निधन झाले. त्यांच्या पश्चात पती, दीर, दोन मुले, पुतणे, पुतण्या, सुना, नातवंडे असा परिवार आहे. आप्पासाहेब रामभाऊ म्हसे यांच्या त्या पत्नी तर दत्तात्रय व सुनील म्हसे यांच्या मातोश्री, ग्रा. पं. सदस्य राकेश म्हसे यांच्या आजी होत.

# पोलिसांना मिळणार ३२० नवीन निवासस्थाने

## नगर येथील वसाहतीचे मुख्यमंत्री फडणवीस यांच्याहस्ते भूमिपूजन

**अहिल्यानगर (प्रतिनिधी)–** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते पोलीस मुख्यालय अहिल्यानगर येथे १०२ कोटी रुपये खर्चून उभारण्यात येणाऱ्या आणि पोलीसांसाठी ३२० नवीन निवासस्थाने असलेल्या वसाहतीचे, तसेच राखीव पोलीस निरीक्षक कार्यालयाच्या प्रशासकीय इमारतीचे भूमिपूजन करण्यात आले.

यावेळी मुख्यमंत्री फडणवीस यांनी नव्याने उभारण्यात येणारी पोलीस वसाहत व राज्य राखीव पोलीस निरीक्षक कार्यालयाच्या प्रशासकीय इमारती विषयी माहिती जाणून घेतली. पोलीस वसाहतीच्या नवीन इमारतीमध्ये प्रत्येक मजल्यावर ८ निवासस्थाने याप्रमाणे ८० निवासस्थाने असून अशा एकूण चार इमारती उभारण्यात येत आहेत. पोलीस अंमलदार निवासस्थानामध्ये २ बेडरुम, हॉल, किचन असा ५० चौ. मी क्षेत्रफळ आहे. पार्किंगमध्ये सर्वत्र सोलरद्वारे विद्युत पुरवठा असून अंतर्गत रस्ते, स्ट्रीट लाईट, सांडपाणी शुद्धीकरण व्यवस्था, अग्निशमन व्यवस्था आदी सुविधा असणार आहेत. नव्याने बांधण्यात येणाऱ्या प्रशासकीय इमारतीमध्ये शस्त्रागार, राखीव पोलीस निरीक्षक कार्यालय, टेंट हाऊस, क्रीडा साहित्य कक्ष, बँड रुम, बेल ऑफ आर्मस् आदी सुविधा उपलब्ध करण्यात येणार आहेत.

**विशेष बोधचिन्हाचे अनावरण**

दरम्यान, चोंडी येथे मंत्री परिषदेच्या बैठकीच्या पूर्वी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या विशेष बोधचिन्हाचे अनावरण करण्यात आले. यावेळी सांस्कृतिक कार्य विभागाचे अपर मुख्य सचिव विकास खारगे यांनी सांगितले की, अहिल्यादेवी होळकर यांच्या जीवन कार्याची माहिती सर्वांना व्हावी, त्यांच्या शिकवणीचा नव्या पिढीला ओळख व्हावी, यासाठी विविध स्तरांवर प्रयत्न केले जात आहेत. त्याचाच एक भाग म्हणून हे बोधचिन्ह तयार करण्यात आले आहे. या बोधचिन्हाचा वापर विविध शासकीय कार्यक्रमांत आणि शासकीय पत्रव्यवहारात केला जाईल.

## पान १ वरुन

### पालिका, झेडपी निवडणुकांचे बिगुल वाजणार

या सुनावणीदरम्यान न्यायमूर्ती सूर्यकांत यांनी निवडून आलेल्या प्रतिनिधींच्या अनुपस्थितीबद्दल चिंता व्यक्त केली आणि नमूद केले की नोकरशहा मध्यंतरी सर्व महानगरपालिका आणि पंचायती चालवत आहेत, सार्वजनिक जबाबदारीशिवाय मोठे धोरणात्मक निर्णय घेत आहेत.या निर्णयामुळे रखडलेल्या मुंबई-पुण्यासह विविध महापालिका, जिल्हा परिषद, पंचायत समित्या, नगर पंचायत निवडणुका घेण्यास हिरवा कंदील मिळाला आहे. राज्यात लवकरच निवडणुकांचे बिगुल वाजण्याची शक्यता आहे.

**न्यायालयाचे निर्देश :**

– निवडणुका २०२२ मधील बांठिया आयोगाच्या अहवालापूर्वी अस्तित्वात असलेल्या ओबीसी आरक्षणानुसारच घेण्यात याव्यात, असे न्यायालयाने स्पष्टपणे सांगितले.

– राज्य निवडणूक आयोगाने ४ आठवड्यांच्या आत निवडणुकांची अधिसूचना जारी करावी, असा आदेश न्यायमूर्ती सूर्यकांत आणि न्यायमूर्ती एन. के. सिंग यांच्या खंडपीठाने दिला.

– ४ महिन्यांच्या आत निवडणुकीची प्रक्रिया पूर्ण करण्याचा प्रयत्न करावा. गरज असल्यास आयोग मुदतवाढ मागू शकतो.

– या निवडणुका बांठिया आयोगाला आव्हान देणाऱ्या याचिकांच्या निकालाच्या अधीन राहतील, तसेच यामुळे कोणत्याही पक्षाच्या युक्तिवादावर प्रभाव पडणार नाही.

### अहिल्यादेवींच्या त्रिशताब्दी वर्षात ऐतिहासिक निर्णयांचा वर्षाव

अहिल्यादेवी होळकर वैद्यकीय महाविद्यालय असे नाव देण्यात आले आहे. तसेच अहिल्यानगर येथे मुलींसाठी शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आयटीआय) सुरू करण्यासही मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. यासाठी २७ शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी आणि बाह्य यंत्रणेव्दारे भरावयाची १२ अशा एकुण ३९ पदांना मान्यता देण्यात आली.

पुण्यश्लोक अहिल्यादेवींनी केवळ स्थापत्य नव्हे, तर श्रध्दास्थानांचे पुनरूज्जीवन करून आपल्याला सांस्कृतिक वारसा दिला. त्यांच्या कार्याची आठवण म्हणून आणि पुढील पिढ्यांना प्रेरणा मिळावी म्हणून चौंडीचे स्मृतीस्थळासह राज्यातील सात प्रमुख तीर्थक्षेत्रांच्या विकासासाठी पाच हजार ५०३ कोटी रूपयांचा आराखडा मंजूर केला. यात चौंडी येथील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर स्मृतिस्थळाचे जतन आणि संवर्धन, अष्टविनायक गणपती मंदिरांचा जिर्णोध्दार, श्री क्षेत्र तुळजाभवानी, त्र्यंबकेश्वर, महालक्ष्मी (कोल्हापूर), माहूरगड आणि ज्योतीबा मंदिर विकास आराखडा यांचा समावेश आहे. तसेच मृद व जलसंधारण विभागामार्फत राज्यभरातील ३४ ऐतिहासिक जलस्रोतांचे संरक्षण, पुनरूज्जीवन आणि सुशोभीकरणासाठी ७५ कोटी रूपयांची योजना राबविली जाणार आहे. यामध्ये घाट, कुंड, बारव, विहिरींचा समावेश आहे. महिला व बाल विकास विभागामार्फत राज्यात 'आदिशक्ती अभियान' व 'आदिशक्ती पुरस्कार योजना' राबविली जाणार आहे. या अभियानासाठी सुमारे १०.५ कोटी रूपयांचा खर्च मंजूर करण्यात आला असून, आरोग्य, शिक्षण, स्वावलंबन आणि अत्याचार प्रतिबंध यावर लक्ष केंद्रित केले जाणार आहे. तसेच ग्राम सामाजिक परिवर्तन फाउंडेशनव्दारे राबविण्यात येणाऱ्या 'मिशन महाग्राम' या अभियानाला २०२९ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. २०२५ मध्ये होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळ्याच्या नियोजनासाठी नाशिक-त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण स्थापन करण्याच्या अध्यादेशास मान्यता देण्यात आली. भाविकांची वाढती संख्या लक्षात घेता अत्याधुनिक नियोजनासाठी हे प्राधिकरण उपयुक्त ठरणार आहे.

धनगर समाजातील विद्यार्थ्यांसाठी नागपूर, पुणे, अमरावती, नाशिक आदी शहरांमध्ये उभारण्यात येणाऱ्या वसतीगृह योजनेस 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर वसतीगृह योजना' असे नाव देण्यात आले आहे. प्रत्येकी २०० विद्यार्थी क्षमतेच्या या वसतीगृहात मुला-मुलींसाठी स्वतंत्र व्यवस्था असेल. इतर मागास बहुजन कल्याण विभागाने धनगर समाजातील विद्यार्थ्यांसाठी सुरू असलेल्या इंग्रजी निवासी शाळा योजनेस 'राजे यशवंतराव होळकर इंग्रजी माध्यम निवासी शिक्षण योजना' असे नाव देण्याचा निर्णय घेतला. १६२ शाळांमध्ये ३१ हजार ३०० विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला असून २८८ कोटी रूपये वितरित करण्यात आले आहेत.

**अहिल्यादेवींच्या जीवनावर बहुभाषिक चित्रपट**

सांस्कृतिक कार्य विभागाने अहिल्यादेवींच्या जीवनावर आधारित मराठीसह विविध भाषांतील व्यावसायिक चित्रपट निर्मितीचा निर्णय घेतला आहे. या चित्रपटाचे जागतिक स्तरावर प्रदर्शन होणार असून, दूरदर्शन आणि ओटीटी प्लॅटफॉर्मवरही तो उपलब्ध राहणार आहे. या चित्रपटाच्या निर्मितीसाठी महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी व सांस्कृतिक विकास महामंडळ हे कार्यान्वयन यंत्रणा म्हणून काम पाहणार आहे.

### मान्सून वेळेआधी दाखल होणार

मराठवाड्यातील काही जिल्ह्यांना ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे. यात गारपिटीचा देखील इशारा देण्यात आला आहे. याशिवाय राज्याच्या उर्वरित भागात वादळी पावसाचा इशारा देण्यात आला आहे.

पुढील तीन दिवस कोकण, मध्य महाराष्ट्र व मराठवाडयात कमाल तापमानात २ ते ३ अंश सेल्सियसने घट होण्याचा अंदाज हवामान खात्याने वर्तवला आहे. त्यानंतरच्या दिवसात पुन्हा २ ते ३ अंश सेल्सियसने तापमान वाढ होईल. विर्दभात पुढील ७२ तासात कमाल तापमानात कोणताही बदल होणार नाही. परंतु त्यानंतर त्यात २ ते ३ अंश सेल्सियसने वाढ होणार आहे. दरम्यान, नाशिक, लातूर याभागात काही ठिकाणी गारपीट झाल्याने कांदा पिकाचे नुकसान झाले आहे. कोकणात काही ठिकाणी पाऊस झाल्याने आंब्याचे नुकसान झाले आहे.

### पारनेर, पाथर्डी, श्रीगोंदा, जामखेड राहुरी तालुक्यांत अवकाळीचा दणका

अवकाळी पाऊस झाला होता. यात आंबा, टोमॅटो, वटाणा, मका, कांदा, केळी बाग, झेंडूची फुले, काढणीस आलेला गहू, डाळिंब, द्राक्ष बागा, भाजीपाला पिके, उन्हाळी बाजरी, चारा पिके आणि पेरूच्या बागांना फटका बसला होता.

### प्रेम प्रकरणातून युवकाची हत्या

त्याचे पळसुंदे गावातील एका मुलीसोबत प्रेमप्रकरण सुरू होते. याची माहिती दोन महिन्यांपूर्वी समजली होती. तेव्हा त्याला 'तू शाळा शिक दुसरे कुटाणे करु नको' असे समजावून सांगितले होते. त्यानंतर सोमवारी (दि.५)भागा महादू दिघे यांच्या मुलाचा साखरपुडा व हळदीचा कार्यक्रम नागमळा सातेवाडी येथे असल्याने सर्वजण कार्यक्रमाला गेलो होतो. कार्यक्रम संपल्यानंतर नवनाथ म्हणाला, की मी आपल्या घरी जातो मला मोटारसायकल द्या, तुम्ही व आई येथेच मुक्कामी थांबा असे सांगून रात्री ११.३० वाजता गाडीवर गेला. त्यानंतर तो मंगळवारी पहाटे ५.३० वाजेच्या सुमारास त्याचे प्रेमसंबंध असलेल्या मुलीस भेटण्यास पळसुंदे येथे गेला असता तिथे त्याला योगेश यशवंत दुटे याने पाहिले व नवनाथला पकडून त्यास लाकडी दांडक्याने जबर मारहाण करुन त्याचा खून केला. यावरुन अकोले पोलिसांनी योगेश दुटे याच्यावर गुन्हा दाखल करुन अटक केली आहे. पुढील तपास पोलीस निरीक्षक मोहन बोरसे यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक संदीप हजारे करत आहेत.

### पुणे, नाशिक, छ. संभाजीनगरसह १६ शहरांत होणार आज मॉक ड्रिल

महाराष्ट्रातील खालील १६ शहरांत मॉक ड्रिल आयोजित केले जाणार आहे. यात मुंबई, ठाणे, पुणे, नाशिक, छत्रपती संभाजीनगर, पिंपरी-चिंचवड, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, उरण, तारापूर, रोहा-नागोठणे, मनमाड, सिन्नर, भुसावळ या शहरांचा समावेश आहे. नाशिक जिल्ह्यात नाशिक शहर, मनमाड आणि सिन्नर येथे मॉक ड्रिल आयोजित केले जाणार आहे.

मॉक ड्रिलच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र सरकारने सर्व यंत्रणांना हाय अलर्टवर ठेवले आहे. प्रशासनाला सतर्क राहण्याच्या सूचना देण्यात आल्या असून पालकमंत्र्यांसह सर्व मंत्र्यांना स्थानिक प्रशासनाशी समन्वय ठेवण्याचे निर्देश दिले आहेत. मंत्रालयात आपत्ती व्यवस्थापन विभागाची बैठक आपत्ती व्यवस्थापन संचालक सतीश खडके यांच्या अध्यक्षतेखाली झाली. यात राज्यातील सर्व महापालिका आयुक्त आणि वरिष्ठ अधिकारी व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे सहभागी झाले.

नागरी सुरक्षा दलाच्या संचालकांचे आवाहन

नागरी सुरक्षा दलाचे संचालक प्रभात कुमार म्हणाले, गृह मंत्रालयाच्या आदेशानुसार, महाराष्ट्रातील १६ शहरांत मॉक ड्रिल होणार आहे. आम्ही यासाठी पूर्णपणे सज्ज आहोत. मुंबईतही विविध ठिकाणी मॉक ड्रिल राबवले जाईल. यात सायरन अलर्ट, अग्निशमन, बचाव कार्य आणि इतर प्रात्यक्षिकांचा समावेश असेल. कोणीही घाबरू नये आणि प्रशासनाच्या सूचनांचे पालन करावे, असे आवाहन त्यांनी नागरिकांना केल आहे.

**सायरन वाजल्यास काय करावे?**

तात्काळ सुरक्षित ठिकाणी जा: ५-१० मिनिटांत जवळच्या सुरक्षित आश्रयस्थळी पोहोचा.

घाबरू नका: सायरन ऐकून पॅनिक होऊ नका, शांतपणे सूचनांचे पालन करा.

मोकळ्या जागेपासून दूर राहा: उघड्या मैदानांवर थांबू नका.

इमारतीत प्रवेश: घर किंवा सुरक्षित इमारतीच्या आत जा.

माहितीचे स्रोत: टीव्ही, रेडिओ आणि सरकारी अलर्ट्सवर लक्ष ठेवा.

अफवांवर विश्वास ठेवू नका: फक्त प्रशासनाच्या अधिकृत सूचनांचे पालन करा.

**सायरन कुठे वाजणार?**

सरकारी आणि प्रशासकीय इमारती, पोलीस मुख्यालय, अग्निशमन केंद्रे, सैन्य तळ, शहरातील बाजारपेठा, गर्दीच्या ठिकाणी (मॉल्स, रेल्वे स्टेशन, बसस्थानके), मॉक ड्रिलमध्ये सहभागी कोण?, जिल्हाधिकारी, स्थानिक प्रशासन, सिविल डिफेन्स वॉर्डन्स, पोलीस कर्मचारी, होम गार्डस, महाविद्यालय आणि शाळांमधील विद्यार्थी, नॅशनल कॅडेट कॉर्प्स, नॅशनल सर्व्हिस स्कीम, नेहरू युवा केंद्र संगठन

### विधानसभेप्रमाणेच स्थानिक स्वराज्यची परीक्षा मेरिटमध्ये जिंका

मंत्री शिवेंद्रराजे भोसले, जिल्हा बँकेचे अध्यक्ष शिवाजीराव कर्डिले, आ. मोनिका राजळे, आ. विक्रम पाचपुते, माती खा. डॉ. सुजय विखे पाटील, माजी आ. बबनराव पाचपुते, वैभव पिचड, भाजपचे महामंत्री विजय चौधरी, लक्ष्मण सावजी, नितीन दिनकर, दिलीप भालसिंग, अभय आगकर यांच्यासह भाजपचे नूतन मंडलाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

यावेळी मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, नगरमध्ये आज दोन महत्त्वाच्या घटना असून यात चोंडीत मंत्रिमंडळ बैठक आणि नगरमध्ये भाजप कार्यालयाचे भूमिपूजन यांचा समावेश आहे. चोंडीच्या बैठकीत सरकारने नगरसाठी विविध घोषणा केल्या असून यात शासकीय महाविद्यालयासह नगरमध्ये मुलींसाठी स्वतंत्र औद्योगिक वसाहतीची यांचा समावेश आहे. तसेच नगरला नव्याने बांधण्यात येणाऱ्या पक्षाच्या कार्यालयाच्या माध्यमातून पक्ष विस्ताराला बळ मिळावे, अशी अपेक्षा व्यक्त करत, या ठिकाणी सामान्य व्यक्तीला व्यथा, प्रश्न मांडण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध व्हावे अशी अपेक्षा केली. तसेच पुढील काही महिन्यांत नगरसह राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होणार आहेत. यात महानगरपालिका, जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगर पालिका व नगर परिषद यांचा समावेश असून या निवडणुकीत विधानसभेप्रमाणे भाजप महायुतीने मेरिटमध्ये जिंकावे, यासाठी आतापासून नियोजन करावे, असे आवाहन कार्यकर्त्यांना केले. पक्ष कार्यालयाचे महत्त्व अधोरेखित करताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, आपल्या घराप्रमाणे पक्षाचे कार्यालय हे एका प्रकारे पक्षाचे घरच आहे. राजमाता अहिल्यादेवी होळकर यांनी मोगल व परकीय आक्रमनांत नुकसान झालेल्या संस्कृतीला, मंदिराला जिवंत करण्याचे काम केले, असे फडणवीस यावेळी म्हणाले. येत्या वर्षभरात नगरचे भाजपच्या कार्यालयाचे बांधकाम पूर्ण करावे, असे आवाहन त्यांनी केले. महसूलमंत्री बावनकुळे यांनी २७ टक्के ओबीसी आरक्षणानूसार निवडणूक घेण्याच्या सरकारच्या निर्णयास सर्वोच्च न्यायालयाने दिली. यामुळे या कार्यकर्त्यांनी तयारी सुरू करावी, असे आवाहन केले. राज्यात १ हजार २८० मंडळाध्यक्षांपैकी १ हजार मंडळाध्यक्ष नेमण्यात आले असले असून याचे श्रेय प्रदेश कार्याध्यक्ष चव्हाण यांना असल्याचे सांगितले. आभार डॉ. सुजय विखे पाटील यांनी व्यक्त केले.